The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# "संत परंपरेतील समकालीन संत कवयित्री"

(विशेष संदर्भ : संत जनाबाई, संत मुक्ताबाई)

**संशोधक : फुले रागिणी बाबुराव**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**प्रस्तावना :**

मराठी वाङ्मयात संत साहित्याचे मोलाचे योगदान आहे. मध्ययुगीन मराठी वाङ्मयात वारकरी संप्रदायाचे साहित्य समाजाभिमुखतेतून आलेले आहे. संतानी साहित्याची निर्मिती ही भक्तीच्या उद्देशान केली आहे. त्यामधून परमेश्वराला प्राप्त करण्याची तळमळ दिसते. अभंग, कथा, किर्तन यांच्या माध्यमातून लोकांनमध्ये भक्तीची भावना निर्माण झाली पाहिजे हा संत साहित्याचा हेतू होता. तसेच त्यांनी आपल्या कथा, किर्तन आणि अभंगातून तत्कालीन समाजाचे प्रबोधन करुन मानवी उत्थानाचा मार्ग अनुसरल्याचे दिसुन येते. प्रत्येक कालखंडात या देशामध्ये अनेक संप्रदाय निर्माण झाले आहेत. भूतकाळ, वर्तमान आणि भविष्यकाळ या विषयांचे प्रबोधन उपदेश त्यांनी आपल्या साहितयातून केले. त्यामुळे जनसामान्यांवर त्यांच्या साहित्याचा प्रभाव आजही दिसून येतो. जीवनातील आदर्शवादी वाटचाल आणि मानवी जीवनातील शाश्वत मूल्यांचा आविष्कार संत साहित्यातून दिसून येतो.

संतानी लोक प्रबोधनाचे कार्य लोकभाषेमधून केले आहे. कारण जनसामान्यांच्या आकलनाबाहेरील असणारी क्लिस्ट भाषातून न समजणाऱ्या गोष्टी लोकभाषामध्ये करुन त्यांच्या मनात रुजवण्याचा प्रयत्न केला गेला आहे. त्यामुळे संत साहित्याप्रती जनसामान्यांच्या मनात असणारी भावना रुजत गेली, म्हणून संत हे आपले मुक्तिदाते किंवा आपला उध्दार करु शकतात. जीवनाला ध्येय देण्याचे काम करतात अशी भावना जनसामान्यात संताबद्दल रुजत गेली आहे. ज्याप्रमाणे संताने समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे. त्याचप्रमाणे संत कवयित्रीने पण समाज प्रबोधनाचे कार्य केले आहे. जसे संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई, संत बहिणाबाई, संत निर्मळाबाई इत्यादी संत कवयित्रीचे महत्वाचे योगदान आहे.

उद्देश :

1. मराठी साहितयामधील संत साहित्याचे महत्व लक्षात येईल.
2. संत साहित्यामधून संत कवयित्री यांचे जीवन कार्याचे चित्रण व्यक्त होईल.
3. स्त्री संतांनी समाजपबोधनाचे कार्य आपल्या अभंगातून केले हे लक्षात येईल.
4. समाज विकासाचे कार्य संत कवयित्री आपल्या साहितयामधून करतात हे लक्षात येईल.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत संशोधनामध्ये तथ्य संकलनासाठी द्वितीय स्त्रोतांचा वापर करण्यात आला यामध्ये पुस्तके, इंटरनेट इ. स्त्रोतांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**संत कवयित्री :** मध्ययुगीन समाजात कर्मठपणा खूप माजला होता यामुळे भागवत संप्रदायातील सर्वच संत एकत्र येऊ लागले व समाज परिवर्तनाची सुरुवात करु लागले. संताबरोबर संत कवयित्री ही मागे राहिल्या नाहीत. संत कवयित्रीने आपणाला आलेला अनुभव समाजासमोर मांडून प्रबोधन करण्याची भूमिका स्वीकारली. खऱ्या अर्थाने समाजात परिवर्तनाचे कार्य केले. त्यांच्या पाऊलखुणा आजही या समाजाच्या अंतरंगात खोलवर दिसून येतात. मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मळा, कान्होपात्रा आदि संत कवयित्रींच्या नावाची मांदियाळी आपणाला सांगता येईल. वारकरी संप्रदायातील संत कवयित्रीचा पाया खऱ्या अर्थाने मुक्ताबाईने व जनाबाईने रचना करण्यास प्रारंभ केला. या संत कवयित्री बदल माहिती पुढीलप्रमाणे पाहू यात

संत जनाबाई :

संत जनाबाई या वारकरी संप्रदायातील एक महत्वाच्या संत कवयित्री आहेत. संत जनाबाईची वृत्ती मुळात बंडखोरीची असल्याकारणामुळे तिचे अभंग हे इतरांपेक्षा वेगळे आहेत. तिच्या अभंगामधील भावना आणि आर्तता मनाला हेलावरणारी आहे. जनाबाई यांचा जन्म एक कनिष्ठ जातीमध्ये झाला होता. अंदाजे इ.स.1258 मध्ये परभणी जिल्हयातील गंगाखेड या गावी झाला. त्यांच्या आईवडिलांची नावे दमा आणि करुंड अशी आहेत. त्यांचा मृत्यु अंदाजे इ.स.1350 मध्ये झाला. जनाबाईच्या वडीलांनी जनाबाईला नामदेवांचे वडील दामाशेट शिंपी यांच्याकडे नोकरीसाठी पाठवले तेव्हापासून त्या संत नामदेव यांच्या कुटूंबातील एक घटक बनल्या. त्या स्वत:ला नामयाची दासी म्हणवून घेत असत. नामदेवांच्या सहवासात त्यांनी पांडुरंगाच्या भक्तीचा ध्यास घेतला. ते जनाबाईचे पारमार्थिक गुरु बनले. त्यामुळेच त्यांना नामयाची दासी म्हणून ओळखल जात पण जनाबाईला काही गुरुप्रेम मिळाले नाही. जनाबाईच्या नशिबात फक्त उपेक्षा आलेली आपणास दिसते.

जनाबाईला समाजातील ठोंगी प्रवृत्तीव भ्रामक अशा कल्पना आढळल्या. त्यावेळी जनाबाईची वाणी उपदेश करु लागते कर्मठ, पाखंडी वृत्तीचीतिने निंदाकेली आहे. जनाबाईची वाणी ही उपेक्षितांचा छळ आठवून कठोर बनलेली आहे. विधेचा खोटा अभिमान बाळगण्यांवर नी टीका करते. मनामधील शुध्द भाव नसल्याने जीव प्राण्याला लुबाडतात. माणसाला धर्माच्या नावावर ठकविणारे नाना वेषधारी भोंग साधूंची निर्भत्सर्नाअशी केली आहे.

"विद्येचा अभिमाने नाईके कीर्तन । पाखंडी हे म्हणे करिती काई
पंचरस पात्रा कांता हे बुडविती । उन्दारलो म्हणती आम्ही संत"?

उपरोक्त ओळीतून जनाबाई दासी असूनही अधिकारवाणीने या जगाला उपदेश करु लागली.

"संतांचा तो संग नव्हे भला तैसा।

पालटावी दशा तात्काळिके ।
चंदनाचे संग पालटती झाडे दुर्बळलाकडे देवमाथा।"2

असे जनाबाईचे स्वत:च्या बळावर तिने कल्पित व वास्तवाचे अदभूत मिश्रण आपल्या अभंगवाणीतून व्यक्त केले. ती आपल्या अंभंगाचा आधार पाडुरंगाच्या साहयाने व्यक्त करते.

**संत मुक्ताबाई :**

संत मुक्ताबाई या महाराष्ट्रातील संत कवयित्री होत्या. संत मुक्ताबाई 'मुक्ताई' या नावाने ओळखल्या जात. त्यांचा जन्म महाराट्रातील आपेगांव येथे इ.स. 1279 साली झाला. रुक्मिणीबाई व विठ्ठलपंत हे त्यांचे आई वडील. संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर व संत सोपानदेव हे मुक्ताबाईचे थोरले भाऊ होते. खरे तर विरकती, ज्ञान, भक्ती, आणि मुक्ती यांचे मूर्तीमंत स्वरुप घेऊन निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ता जन्माला आली. मुक्ताबाईला लहानपणापासून समाजात बहिष्कृत जीवन जगावे लागले. समाजासाठी त्यांनी चंदनाप्रमाणे स्वत:ला झिजवले. या जगाला ज्ञानरुपी डोस पाजले. समाजाने मुक्ताबाईची अवहेलना केली. लहानपण आई-वडील वारल्यामुळे आपल्या भावंडा सोबत तीला आईची व बहिणीची भूमिका पार पाडावी लागली. ज्ञानदेव व भांवडाचा संसार तिला चालवावा लागला. मुक्ताबाईचे गुरु हे त्यांचे वडील बंधु निवृत्तीनाथ हे होते. आपल्या गुरुच्या सहवासात राहून अख्यात्म क्षेत्रातील धडे गिखले. मुक्ताबाईनी योगी चांगदेवांना 'पासष्टी' चा अर्थ उलगडून दाखविला. मुक्ताबाईच्या अनुग्रहाने चांगदेवाना आत्मरुपाची प्राप्ती झाली. तेव्हा त्यांचे 1400 वर्षाचे आयुष्य धन्य झाले. वयाच्या 14 व्या वर्षाचे तिने चांगदेवाना आपले शिष्य करुन घेतले.

मुक्ताबाईच्या अभंगातून या समाजापासून आपण वेगळे आहोत याची जाणिव वेळोवेळी दिसून येते. तर या समाजाने आपल्याकडे पाठ फिरवल्याने त्या आत्मजीवनात रमत नाहीत. व्यक्तिगत जीवनाचा निसटताही उल्लेख तिच्या अभंग सृष्टीत नाही. समाजाला प्रबोधन करण्यासाठी, समाजाला प्रपंचाची क्षणभंगुरता मायेचा पसारा आहे हे ती पटवण्यासाठी उपदेशपर अभंगाची निर्मिती केली.

विश्वांति मनाची निजशांती साची। मग त्या यमाची भेट नाही ।। 1।।
अधिकार मन मात्र सारी स्नान। रोकडेचे साधन आले हाता ।। 2 ।।
साधिले साधन नित्य अनुष्ठान। चिंतीनारायण मंत्रे जपे ।। 3 ।।
मुक्ती प्रविण नारायण धन। नित्य मंत्र स्नान कटी वेगी ।। 4 ।।

या अभंगात कोरडा उपदेश व्यक्त करताना सर्वसामान्य माणसाला ती अधिकार वाणीने बोलते अशा किती तरी प्रापचिकांना तिनेउपदेश केला आहे.

**समारोप :**

संत कवयित्री ह्या बहुजन समाजाचे चित्रण करणाऱ्या आहेत. संत जनाबाईने अत्यंत शुद्र जीवनातून अलौकिक जीवनाकडे झेप घेतली. तिला ईतर संत कवयित्रीपेक्षा अधिक मोठा लढा द्यावा

लागला. दासीचे जीवन तिला जगावे लागले याचे चित्रण तिने आपल्या अभंगातून व्यक्त केले आहे. संत मुक्ताबाई ह्या उच्च जातीत पण जन्माला येवून त्यांना उपेक्षित जीवन जगावे लागले. अवघ्या लहान वयात समाजाची हाल अपेष्टा सहन करावी लागली.

**निष्कर्ष :**

1. संत जनाबाईची अभंग रचना समकालीन कवयित्री अनुभुतीपेक्षा विलक्षण भिन्न असून ती अनुभव व अभिव्यक्तीमध्ये इतर कवयित्रीच्या तुलनेत वरचढ ठरते.
2. संत मुक्ताबाईचे अभंग हे अनुभूतीपेक्षा ज्ञानात्मक पातळीवर श्रेष्ठ आहेत.

संदर्भ :

1. जनाबाई - श्री नामदेव गाथा, प्र.क्र.385 अभंग कृ.163, गीता प्रेस, गोरखपुर.
2. जनाबाई - श्री नामदेव गाथा, अभंग क्र.164, पृ.क्र.384, गीता प्रेस, गोरखपुर.
3. मुक्ताबाई - श्री सकल संतवाणी, अभंग क्र.23, गीता प्रेस, पृ.क्र.165, गोरखपुर.